राज्यातील ४८ तालुक्यामध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक-आयटीआय-३०९४/(५०९५)/व्यशि - १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- १८ ऑक्टोबर, १९९५.

पहा :- १) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक- ११/सीटीएस/१९९५/११५२, दिनांक १८.८.९५.

शासन निर्णय :- राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, टप्प्या टप्प्याने सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. त्यास अनुसरुन राज्यातील आदिवासी उपयोजनेतर्गत येणा-या १५ तालुक्यामध्ये व बिगर आदिवासी क्षेत्रातील ३३ तालुक्यामध्ये प्रत्येकी १ याप्रमाणे ४८ नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ऑगस्ट १९९५ च्या सत्रापासून सुरु करण्यास या आदेशान्वये प्रपत्र "अ" प्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

२. शासन या आदेशान्वये या प्रत्येक संस्थेत प्रपत्र "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे पदे तात्पुरती निर्माण करण्यास व ती भरण्यासही मंजूरी देत आहे. सदर पदे आवश्यकतेनुसार भरण्यात यावीत. ही पदे सुरुवातीला दिनांक २८.२.१९९६ पर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे व ती पुढे चालू ठेवण्यासाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रस्ताव सादर करावा. संबंधित पदे त्या त्या संवर्गात तात्पुरती वाढ समजण्यात यावी. त्या त्या पदावरील पदधारक नियमानुसार मिळणा-या वेतन, भत्ते इत्यादिस पात्र असतील. वेतन, भत्ते, सामुग्री पुरवठा इत्यादींसाठी प्रत्येक संस्थेसाठी एकूण रु.४,००,०००/- इतक्या आवर्ती खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच यंत्रसामुग्री, कार्यालयीन फर्निचर खरेदी इत्यादिसाठी कराव्या लागणा-या खर्चासाठी प्रत्येक संस्थेसाठी रु.३,००,०००/- अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. बिगर आदिवासी क्षेत्रातील ३३ औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी सदर खर्च सुरुवातीला शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक-आकनि-१९९५/१७७/अर्थसंकल्प-६ लेखाशिर्ष सांकेतांक ८००0-१०७-५ दिनांक १६ ऑक्टोबर १९९५ अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या रु.२,३१,००,०००/- (रु.दोन कोटी एकतीस लाख फक्त) मधून भागविण्यात यावा. [illegible] तात्पुरती वाढ समजण्यात यावी. [illegible]

..२../-

शिर्षाखाली दर्शविण्यांत यावा.

"२२३०-कामगार व सेवायोजन

०३ प्रशिक्षण

००३ शिल्प कारागिर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण

००३ [दोन] [बी] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
शिल्पकारागिरांच्या तांत्रिक व व्यावसायीक
प्रशिक्षणाचा विस्तार मागणी क्रमांक- डब्ल्यू-५"

तसेच आदिवासी उपयोजनांतर्गत येणा-या १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी सदर खर्च सुरुवातीला शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११९५/१११/अर्थसं-१७ संगणक सांकेतांक ८०००-१११-९ दिनांक- १८ ऑक्टोबर, १९९५ अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या रु १,०५,००,०००/-[ रुपये एक कोटी पाच लाख फक्त] मधून भागविण्यात यावा व पुरवणी मागणीद्वारे तरतूद झाल्यानंतर ती पुढील अर्थसंकल्प शिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

[ " २२३०-कामगार व सेवायोजन जनजाती क्षेत्र उपयोजना
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना

०३ प्रशिक्षण

००३ कारागीर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण
संस्था [ए] राज्य योजनांतर्गत योजना [२२३००७६४]
[ रु ५१,००,०००/-] [डी] भारतीय संविधानाच्या
अनुच्छेद २७५ [१] अन्वये केंद्रीय सहाय्य [ रु ५४,००,०००/-] ]

४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी बिगर आदिवासी उपयोजनेतर्गत येणा-या संस्थासाठी आकस्मिकता निधीमधून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिका-यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात/पत्रात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणा-या देयकावर आकस्मिकता निधी अग्रीम शासन ज्ञापन वित्त विभाग आकनि-११९५/१०७/अर्थसं-८, संगणक सांकेतांक ८०००-१०७-५ दि. १६-१०-९५ अन्वये मंजूर असे स्पष्ट सूचना त्या आदेशात /पत्रात अंतर्भूत करावी. व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

तसेच आदिवासी उपयोजनंतर्गत येणा-या संस्थासाठी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिका-यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात/पत्रात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणा-या देयकावर आकस्मिकता निधी अग्रीम शासन ज्ञापन वित्त विभाग आकनि- ११९५ / १११/अर्थसं-१७ संगणक सांकेतांक-८०००-१११-९

...३/-

प्रति, ~~सहाय्यक~~ उप कामगार आयुक्त

...अग्रीम मंजूर

... स्पष्ट सूचना त्या आदेशात/पत्रात अंतर्भूत करावी व ही सूचना ... शाईने अधोरेखित करावी.

५. मंजूर अग्रीम रक्कमेतून प्रत्यक्ष खर्ची पडलेल्या रक्कमेबाबत ... अहवाल संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी उच्च व तंत्रशिक्षण ... विभागास पाठवावा. सोबतच्या परिशिष्ट"अ" मधील ४८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्राचार्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून निर्देशित करण्यांत येत आहे. त्यांनी खर्चाचा अहवाल संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावा.

६. संबंधित खर्च हा आकस्मिकता निधी अग्रीमातून खर्ची पडणार असल्यामुळे महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियमावलीतील नियम क्रमांक ६, ८ व १२ प्रमाणे देयके सादर करतांना पुढीलप्रमाणे कार्यवाही व्हावी.

अ] आकस्मिकता निधीतून करण्यांत येणाऱ्या खर्चासंबंधिच्या प्रत्येक प्रमाणकावर तांबड्या शाईने स्पष्ट आकस्मिकता निधीतून अशी नोंद घेण्यांत यावी.

ब] जर आकस्मिकता निधीतून मंजूर झालेल्या रक्कमा पूर्ण खर्च होणार नसेल तर अग्रीम रक्कम कमी करण्यासाठी शासनाकडे वेळीच प्रस्ताव सादर करावा.

क] आकस्मिकता निधीतून खर्च करण्यांत येणाऱ्या रक्कमेचा सतत मेळ घालण्यांत यावा.

ड] आकस्मिकता निधीतून केलेल्या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी बिले पाठवून काढावी.

इ] अशा प्रत्येक बिलावर व प्रतीपत्रावर वित्त विभागाने ज्या शासकीय ज्ञापनाद्वारे अग्रीम मंजूर केला त्याचा क्रमांक व दिनांक नमूद करावा.

फ] बिलासोबत पाठविण्याच्या स्लिपवर लेखाशिर्ष कोड नंबर व खर्चाचा कोड नंबर नमूद करावा.

७. आकस्मिकता निधीची परिपूर्ती करण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्याकरीता संबंधित जिल्हा नियोजन व विकास मंडळाने जिल्हा नियोजनात केलेल्या तरतूदीच्या माहितीसह प्रस्ताव संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना त्वरीत सादर करावा.

सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६००/[illegible]
दिनांक ९.१०.९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ.कारखानीस
अ.अ.कारखानीस

[अ. अ. कारखानीस]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नाशिक/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती
प्राचार्य, सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
द्वारा, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, [लेखा परिक्षा], मुंबई/नागपूर
जिल्हा कोषाधिकारी, प्रपत्र "अ" प्रमाणे
जिल्हाधिकारी, तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, प्रपत्र "अ" प्रमाणे
नियोजन विभाग/ वित्त विभाग, व्यय-५, व्यय-५अ, अर्थसं-३, अर्थसं-१७
आदिवासी विकास विभाग
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, व्यशि-२, व्यशि-३, अर्थसं-२
महसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, [मुंबई [४ प्रती]
निवड नस्ती व्यशि-१

| | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | ९] पेठ | १] संधाता | — १२ |
| | | २] पत्रेकारागिर | — १६ |
| | | ३] जोडारी | — १६ |
| | | ४] तारतंत्री | — १६ |
| | | ५] ड्रेस मेकिंग [मु.] | — १६ |
| | | ६] बेकरी व कन्फेक्शनरी [मु.] | १६ |
| | | | ९२ |
| ४. धुळे | १०] तळोदा | १] पंप मेकॅनिक | — १६ |
| | | २] संधाता | — १२ |
| | | ३] तारतंत्री | — १६ |
| | | ४] यांत्रिक [रेडिओ व दूरचित्रवाणी] | — १६ |
| | | ५] ड्रेस मेकिंग [मु.] | — १६ |
| | | ६] बेकरी व कन्फेक्शनरी [मु.] | — १६ |
| | | | ९२ |
| | ११] अक्कलकुआ | १] संधाता | — १२ |
| | | २] नळकारागिर | — १६ |
| | | ३] वीजतंत्री | — १६ |
| | | ४] जोडारी | — १६ |
| | | ५] शिवण व कर्तन [मु.] | — १६ |
| | | ६] बेकरी व कन्फेक्शनरी [मु.] | — १६ |
| | | | ९२ |
| | १२] पिंपळनेर [साक्री] | १] संधाता | — १२ |
| | | २] पंप मेकॅनिक | — १६ |
| | | ३] जोडारी | — १६ |
| | | ४] तारतंत्री | — १६ |
| | १] अक्कलकुआ | ५] ड्रेस मेकिंग [मु.] | — १६ |
| | | ६] बेकरी व कन्फेक्शनरी [मु.] | १६ |
| | | | ९२ |
| | १३] अक्राणी (धडगांव) | १] गवंडी | — १६ |
| | | २] सुतारकाम | — १६ |
| | | ३] जोडारी | — १६ |
| | | ४] तारतंत्री | — १६ |
| | | ५] शिवण व कर्तन | — १६ |
| | | ६] बेकरी व कन्फेक्शनरी [मु.] | — १६ |
| | | | ९६ |

## प्रपत्र - ब

तालुका स्तरावर सुरु करावयाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी निर्माण करावयाच्या पदांचा तपशील.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | प्राचार्य | २००० - ३५०० | १ |
| २. | गटनिदेशक | १६४० - २९०० | १ |
| ३. | शिल्प निदेशक | १४०० - २६०० | ६ |
| ४. | गणित/चित्रकला निदेशक | १४०० - २६०० | १ |
| ५. | भांडारपाल | १४०० - २३०० | १ |
| ६. | लेखापाल | १२०० - २०४० | १ |
| ७. | वरिष्ठ लिपिक | १२०० - २०४० | १ |
| ८. | लिपिक-कम-टंकलेखक | ९५० - १५०० | १ |
| ९. | कर्मशाळा परिचर | ७५० - ९४० | १ |
| १०. | भांडार परिचर | ७५० - ९४० | १ |
| ११. | शिपाई | ७५० - ९४० | १ |
| १२. | सफाईगार | ७५० - ९४० | १ |
| १३. | चौकीदार | ७५० - ९४० | २ |
| | | एकूण :- | १९ |